फळबाग

# अशी करा पपईची लागवड




प्रा. दर्शना मोरे
(मो.नं.९६८९२१७७९०)
प्रा. पल्लवी घुले
क.का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक




पपईच्या लागवडीपूर्वी जमिनीची आडवी-उभी नांगरणी करावी. कुळवाने वखरपाळी देऊन ढेकळे फोडून घ्यावीत व जमीन सपाट करून घ्यावी. लागवड २.५ x २.५ किंवा २.२५ x २.२५ मी. अंतरावर करावी. पपई लागवडीसाठी दीड ते दोन महिन्यांची रोपे वापरावीत.

भारतात पपईची लागवड महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, आसाम, बिहार व पश्चिम बंगाल इत्यादी राज्यांत मोठ्या प्रमाणात होते. महाराष्ट्रात जळगाव, धुळे, नंदुरबार, अमरावती, जालना, नाशिक, अहमदनगर, पुणे, सोलापूर व सातारा या जिल्ह्यांत लागवड केली जाते. कमी कालावधीत, कमी खर्चात चांगले उत्पन्न पपई या पिकातून मिळते. पपईचा उपयोग फळ म्हणून तसेच टुटी-फ्रुटी, जॅम, जेली इत्यादी पदार्थ तयार करण्यासाठी होतो. पपईच्या पेपेनपासून औषधे व च्युईंगम तयार केली जाते.

**लागवडीसाठी आवश्यक बाबी**

पपईची लागवड करण्यासाठी सुपीक, मध्यम- काळी, रेतीमिश्रित पोयट्याची जमीन योग्य ठरते. जमीन काळी असल्यास पाण्याचा योग्य निचरा होणे आवश्यक असते. तसेच मुख्य खोडाभोवती कायमस्वरुपी पाणी साठले जाऊ नये. जमीन मध्यम ते रेतीमिश्रित पोयटायुक्त असल्यास, कुजलेल्या सेंद्रिय खतांचा वापर करणे गरजेचे असते. पपई या फळपिकाला यशस्वीरित्या उत्पादनासाठी सरासरी १५ ते ३० सेल्सियस तापमानाची आवश्यकता असते. पपई जास्तीत जास्त ४४ से. तर किमान १० से. पर्यंत तापमानाला सहनशील असते. पपई हे पीक उष्ण कटिबंधात वाढणारे आहे.

**विविध जाती** : कुर्ग, हनी ड्यू, अर्का प्रभात, सनराईज सोलो, पुसा डेलिशियस, वॉशिंग्टन, कोईमतूर-५, कोईमतूर-६, पुसा डॉर्फ, पुसा नन्हा, पुसा जॉईंट इत्यादी.

**लागवडीसाठी हंगाम**

पपईची लागवड वर्षभर मुख्यत्त्वे जून- जुलै, सप्टेंबर-ऑक्टोबर आणि जानेवारी- फेब्रुवारी या तीन हंगामांत करतात. महाराष्ट्रात मुख्यत्त्वे लागवड जून ते ऑक्टोबरपर्यंत केली जाते.

**लागवड अशी करावी**

लागवड बियांपासून रोपे तयार करून केली जाते. साधारणत: १ हेक्टर क्षेत्रासाठी २५०- ३०० ग्रॅम बियाण्यांपासून रोपवाटिका तयार करावी. पपईची जात द्विलिंगी असल्यास जास्त बियाणेमात्रेची आवश्यकता असते. जर जात उभयलिंगी असेल तर कमी बियाणेमात्रेची आवश्यक असते. द्विलिंगी जातींच्या झाडामध्ये ५०% नर झाडांची आवश्यकता असते. अशा वेळी वेळेस फुलोरा अवस्थेमध्ये असताना अतिरिक्त नरांची झाडे उपटून टाकावी लागतात. म्हणून अशा ठिकाणी २-३ रोपांची लागण करणे आवश्यक असते.

**रोपवाटिका तयार करणे**

पपई रोपवाटिका माध्यम तयार करण्यासाठी ५ किलो कोकोपिट + २.५ किलो पोयटा माती + अधिक कुजलेले शेणखत + १०० ग्रॅम ट्रायकोडर्मा + १०० ग्रॅम १९:१९:१९ खत या प्रमाणात मिश्रण एकजीव करून ते ट्रे किंवा पॉलिथिन बॅगमध्ये भरून घ्यावे. तसेच या माध्यमामध्ये बिया १.५ सें.मी खोलीवर टोकाव्यात. बियाणे टोकल्यानंतर अलगद झाकून टाकावे व झारीच्या सहाय्याने पाणी द्यावे. तसेच रोपे (पॉलिथिन बॅग किंवा ट्रे) शेडनेट मध्ये ठेवावीत.

**लागवड पद्धत**

पपईच्या लागवडीपूर्वी जमिनीची आडवी-उभी नांगरणी करावी. कुळवाने वखरपाळी देऊन ढेकळे फोडून घ्यावीत व जमीन सपाट करून घ्यावी. लागवड २.५ X २.५ किंवा २.२५ X २.२५ मी. अंतरावर करावी. पपई लागवडीसाठी दीड ते दोन महिन्यांची रोपे वापरावीत.

**पपई बागेसाठी खत व्यवस्थापन**

ज्या क्षेत्रामध्ये लागवड करायची आहे त्या क्षेत्रामध्ये उभी-आडवी नांगरणी करताना प्रतिहेक्टर २० टन योग्य कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट खत मिसळून द्यावे. लागवडीनंतर प्रत्येक झाडास खालीलप्रमाणे खत व्यवस्थापन करावे.

| अ. क्र. | मात्रा | वेळ |
|---|---|---|
| १ | युरिया १०८ ग्रॅ. (नत्र ५०. ग्रॅ.)<br>डी.ए.पी १०८ ग्रॅ. (स्फुरद ५० ग्रॅ.)<br>एम.ओ.पी. ८३ ग्रॅ. (पालाश ५० ग्रॅ.) | लागवडीच्या वेळी |
| २ | युरिया १०८ ग्रॅ. (नत्र ५० ग्रॅ.)<br>डी.ए.पी १०८ ग्रॅ. (स्फुरद ५० ग्रॅ.)<br>एम.ओ.पी. ८३ ग्रॅ. (पालाश ५० ग्रॅ.) | लागवडीनंतर तिसऱ्या महिन्यात |
| ३ | युरिया १०८ ग्रॅ. (नत्र ५० ग्रॅ.)<br>डी.ए.पी १०८ ग्रॅ. (स्फुरद ५० ग्रॅ.)<br>एम.ओ.पी. ८३ ग्रॅ. (पालाश ५० ग्रॅ.) | लागवडीनंतर पाचव्या महिन्यात |
| ४ | युरिया १०८ ग्रॅ. (नत्र ५० ग्रॅ.)<br>डी.ए.पी १०८ ग्रॅ. (स्फुरद ५० ग्रॅ.)<br>एम.ओ.पी. ८३ ग्रॅ. (पालाश ५० ग्रॅ.) | लागवडीनंतर सातव्या महिन्यात |

**पपई उत्पादनासाठी विशेष बाबी**

द्विलिंगी जातींची लागवड केल्यास पपई बागेमध्ये १०% नरांच्या झाडांची आवश्यकता असते. उदा. वॉशिंग्टन, कोईमतूर-५, कोईमतूर-६, पुसा डॉर्फ, पुसा नन्हा, पुसा जॉईंट इत्यादी. या १०% नरांची झाडे क्षेत्रामध्ये विखुरलेल्या स्वरुपात लावावीत. इतर झाडे उपटून टाकावीत. उभयलिंगी पपईची जातीची लागवड करण्यासाठी प्रत्येक ठिकाणी एकच रोप लावावे. उदा. कुर्ग, हनी ड्यू, अर्का प्रभात, सनराईज सोलो, पुसा डेलिशियस इत्यादी. ■